महावितरण

क्र.साप्रवि/रवका/न.क्र.३९२/
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत,
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,
मुंबइ - ४०० ०१९.

# प्रशासकीय परिपत्रक क्र. २५ दिनांक ७/३/२००६

**विषय : सेवा विनियम क्र.१०३ (ख) मध्ये "माहिती व जनसंपर्क" संवर्गाचा समावेश करण्याबाबत.**

कंपनीच्या (पूर्वीच्या मंडळाच्या) सेवेत कार्यरत असतांना प्रत्येक संवर्गासाठी विहित केलेल्या विषयात पदव्युत्तर पदवी प्राप्त केल्यास एक जादा वेतनवाढ देण्याची तरतूद म.रा.वि.मंडळ कर्मचारी सेवा विनियमात केल्यानंतर त्याच्या अंमलबजावणीसाठी मुख्य कार्यालयाचे परिपत्रक क्र.२०० दि. २१/६/७९ अनुसार पदव्युत्तर पदवी/पदविका उत्तीर्ण केलेल्या कर्मचा-यांना द्यावयाच्या जादा वेतनवाढीसंदर्भात मार्गदर्शक तत्वे प्रसृत करण्यात आली होती. त्यानंतर प्रशासकीय परिपत्रक क्र.३०० दि. ५/७/८३ अन्वये "प्रसिध्दी व जनसंपर्क" या संवर्गातील कर्मचा-यासाठी एक जादा वेतनवाढ मिळण्यासाठी "पत्रकारिता" या विषयातील पदव्युत्तर पदवी/पदविका हा अभ्यासक्रम विहित करण्यात आला होता.

२. सेवाविनियम क्र.१०३ (ख) मधील आगाऊ वेतनवाढीबाबतच्या तरतुदींचे संकलन करुन आणि त्याचा आढावा घेऊन सर्व तरतुदी स.सा.आ.क्र.१८ (क) दि. २८/५/६३ ची दु.चि.क्र.३०८ दि. १०/७/८४ अन्वये नव्याने प्रसृत करण्यात आल्या. असे करताना "प्रसिध्दी व जनसंपर्क" या संवर्गाचा समावेश सेवा विनियम क्र.१०३ (ख) मध्ये करण्याचे राहून गेल्याने त्या संवर्गातील कर्मचा-याना जादा वेतनवाढ मंजूर करता येत नव्हती. आता "माहिती व जनसंपर्क" या संवर्गाचा समावेश पुन्हा सेवा विनियम क्र.१०३ मध्ये खालीलप्रमाणे करण्यात येत आहे.

(झ) **"माहिती व जनसंपर्क संवर्ग"**

विद्यापीठ किंवा महाराष्ट्र शासन/भारत सरकारने मान्यता दिलेल्या संस्थेची पत्रकारिता विषयातील पदव्युत्तर पदवी (मास्टर ऑफ जर्नालिझम).

४. "माहिती व जनसंपर्क" संवर्गातील कर्मचा-यांचा समावेश सेवा विनियम क्र.१०३ (ख) मध्ये स.सा.आदेश क्र.१८(क) ची दु.चि.क्र.३०८ दि. १०/७/८४ च्या तरतुदी लागू झाल्यापासून करण्यात आला आहे असे समजून त्यानंतरची काही प्रलंबित प्रकरणे असल्यास ती वरील तरतुदीनुसार निकाली काढावीत. सेवा विनियम क्र.१०३(ख) मधील इतर बाबी अबाधित रहातील.

५. सदर प्रशासकीय परिपत्रक संचालक(संचलन) व संचालक(वित्त) यांच्या सहमतीने व्यवस्थापकीय संचालक(मराविविकंम) यानी दिलेल्या मंजुरीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

(स्वाक्षरी)
**( सु. य. पाटील )**
**मुख्य महाव्यवस्थापक(क)**

प्रत :
म.रा.वी.वितरण कं.मर्या.च्या विभागीय व त्यावरील कार्यालयीन स्तरापर्यंत प्रेषण यादीप्रमाणे.

C:\My Documents\Muradi\Circular-I&PRO.doc